स्वातंत्र्याचा अमृत महोत्स


महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
Email-socialsciencedept@maa.ac.in


जा.क्र.राशैसंप्रपम /लो.शि./२०२३-२४/ दि.२९ /०५ /२०२३

प्रति,

१) विभागीय शिक्षण उपसंचालक,सर्व
२) उपसंचालक,प्रादेशिक विद्या प्राधिकरण, सर्व
३) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सर्व
४) शिक्षणाधिकारी माध्यमिक/प्राथमिक, सर्व
५) शिक्षण उपनिरीक्षक (दक्षिण/पश्चिम/उत्तर)मुंबई
६) प्रशासन अधिकारी म.न.पा./न.पा./न.प.सर्व

**विषय - केंद्र पुरस्कृत नवभारत साक्षरता कार्यक्रमासाठी विकसित करण्यात आलेल्या मोबाईल ॲपचे प्रशिक्षणाबाबत.**

**संदर्भ** - १. योजना कार्यालयाचे पत्र जा. क्र. शिसंयो/नभासा /२०२२-२३/योजना-३/१०२६ दिनांक १६.५.२३

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार उपरोक्त विषयानुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये प्रौढ व निरंतर शिक्षण या संबंधी उल्लेख आहे. त्यातील परिच्छेद क्र.२१.४ मध्ये नमूद करण्यात आले आहे की विशेषतः प्रौढ शिक्षणासाठी भक्कम आणि नाविन्यपूर्ण शासकीय उपक्रमाद्वारे तसेच , समुदाय सहभाग आणि तंत्रज्ञानाचे सहज आणि फायदेशीर एकत्रीकरण केले जाईल, ज्यामुळे १०० टक्के साक्षरतेचे उदिष्ट लवकरात लवकर साध्य करणे शक्य होईल . त्यानुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने आणि २०२१ च्या अर्थसंकल्पीय घोषणेच्या अनुषंगाने केंद्र शासनाने दिलेल्या सूचनेनुसार प्रौढ शिक्षणाची एक नवीन योजना **नवभारत साक्षरता कार्यक्रम** सन २०२२-२३ ते २०२६-२७ या कालावधीत राबविण्याचा निर्णय शासनामार्फत घेण्यात आलेला आहे. सदर योजेनेचा कालावधी १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२७ असा आहे. सदर योजना केंद्र व राज्यशासन यामधील सर्व जिल्ह्यांमधील ग्रामीण व शहरी या दोन्ही भागात लागू करण्यात आलेली आहे.

ऑनलाईन सर्वेक्षणासाठी मोबाइल ॲप विकसित करण्यात आले आहे. सर्व क्षेत्रीय अधिकारी यांचे सदर मोबाइल ॲपचे प्रशिक्षण ऑनलाईन पद्धतीने **युट्युब लाईव्हद्वारे दि. २ जून २०२३ रोजी सकाळी ११:३० वाजता** आयोजित करण्यात आले आहे. सबब आपण व आपले अधिनस्थ असणारे नवभारत साक्षरता योजनेचे काम पाहणारे अधिकारी व कर्मचारी तसेच शालेय स्तरावरील सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणा, शालेय मुख्याध्यापक व शिक्षक यांनी सदर प्रशिक्षणासाठी उपरोक्त कालावधीत ऑनलाईन पद्धतीने युट्युब लाईव्ह या समाज माध्यमावर उपस्थित राहावे.

Join होण्यासाठी Youtube live लिंक पुढीलप्रमाणे
**https://youtube.com/live/F4mVaLbOFjk?feature=share**

(रमाकांत काठमोरे)
सहसंचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, महाराष्ट्र पुणे -३०

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
२. मा.आयुक्त (शिक्षण) ,महाराष्ट्र राज्य , पुणे - १.

प्रत माहितीस्तव -

१. मा. संचालक, योजना कार्यालय , पुणे.

प्रत कार्यवाहीस्तव -

- गटशिक्षणाधिकारी ( सर्व ),पंचायत समिती (सर्व ), महाराष्ट्र राज्य

२/- उपरोक्त कालावधीत आपले अधिनस्थ असणारे विस्तारअधिकारी ( शिक्षण) , केंद्रप्रमुख, तसेच सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमांच्या शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक यांनी सदर प्रशिक्षणासाठी online मोड मध्ये Youtube Live या समाज माध्यमावर उपस्थित राहणेबाबत संबधितांना आपले स्तरावरून आदेशित करण्यात यावे.